थोडक्यात...

आदिती महाविद्यालयाची तन्वी देवकते हिची महाराष्ट्र संघात निवड ; भोपाळ येथील राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

(सचिन रायपत्रीवार/दै.धर्मयोध्दा)

जिंतुर -जिंतूर तालुक्यातील कुऱ्हाडी येथील आदिती कला वाणिज्य व विज्ञान उच्च माध्यमिक विद्यालय कुऱ्हाडी येथील विद्यार्थिनी तन्वी संजय देवकते हिची ड्रॅगन बोट जूनियर राष्ट्रीय स्पर्धा भोपाळ येथे होणाऱ्या स्पर्धेसाठी निवड झाली आहे मध्यप्रदेश येथील भोपाळ मध्ये १३ व्या राष्ट्रीय ड्रॅगन बोट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी महाराष्ट्र राज्य संघात निवड होण्यासाठी निवड चाचणी रॉयल कृष्णा बोट क्लब व स्वामी समर्थ घाट सांगली यांच्या वतीने निवड चाचणी घेण्यात आली होती या निवड चाचणीत अदिती उच्च माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी तन्वी संजय देवकते या विद्यार्थिनीची महाराष्ट्र राज्य संघामध्ये निवड झाली आहे त्यामुळे आता मध्य प्रदेशातील भोपाळ येथे सुरू असलेल्या राष्ट्रीय ड्रॅगन बोट स्पर्धेत खेळण्यासाठी निवड झाली आहे त्यामुळे तिचे अभिनंदन संस्था अध्यक्ष लक्ष्मण वाहुळे प्राचार्य राहुल वाहुळे प्रा.भारतीय शेजावळे प्रा. खुशाल घनसावत प्रा.मुरलीधर पवार कल्याण मुरकुटे सचिन इंजे शेषराव इंजे आदींनी केले आहे.

आमदार प्रविण दरेकर यांची विधीमंडळ आश्वासक समितीच्या अध्यक्षपदी निवड; प्रशांत नवगिरे यांनी केला सत्कार

(अजित चव्हाण/दै.धर्मयोध्दा)

जळकोट –महाराष्ट्र विधानपरिषद गटनेते, राज्याचे माजी विरोधी पक्ष नेते, मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष, भाजपा नेते आमदार प्रविण दरेकर यांची महाराष्ट्र विधीमंडळ आश्वासक समितीच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली. तळागाळातील सामान्य कार्यकर्त्यांची जाण असणारा नेता, सामान्यांच्या अडचणी तात्काळ सोडविणारा नेता तसेच मुख्यमंत्र्यांचे अत्यंत विश्वासु म्हणून ओळखले जाणारे आमदार प्रविण दरेकर यांची नुकतीच महाराष्ट्र विधीमंडळ आश्वासक समितीच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली. या निवडीमुळे धाराशिव जिल्ह्यातील भाजपा चे युवा नेते प्रशांत नवगिरे यांनी आमदार प्रविण दरेकर यांचा मुंबईतील चर्चगेट येथील त्यांच्या कर्तव्यपथ कार्यालयात सत्कार केला. यावेळी त्यांच्यासोबत पंकज नवगिरे, साताराचे अजिंक्य महाडीक, सोलापूरचे बाळासाहेब सुरवसे, बीडचे एकनाथ कदम यांच्यासह जिल्हयातील कार्यकर्ते उपस्थित होते.

ओपन जिम्सला ७ ऐवजी १४ लाख रूपये मिळणार–मंत्री भरणेंच्या भेटीनंतर आमदार गुट्टेंनी दिली माहिती

(अली चाऊस/दै.धर्मयोध्दा)

गंगाखेड- गावखेड्यांसह शहरी भागातील युवकांच्या निरोगी शरीरयष्टी आणि नियमित व्यायाम करता यावा, या दृष्टीने ओपन जिम्स ही योजना राबवली जात आहे. परंतु, त्यासाठी मिळणारे अनुदान हे ७ रूपये होते. मात्र, ते पुरेसे ठरत नव्हते. त्यामुळे राज्याचे क्रीडा, युवक व अल्पसंख्याक मंत्री ना.दत्तात्रय भरणे यांच्याकडे पाठपुरावा करून ओपन जिम्ससाठी प्रत्येकी १४ लाख रूपये अनुदान देण्याची विनंती केली होती. त्यास यश आले असून आता इथून पुढे राज्यातील ओपन जिम्ससाठी १४ लाख रूपये देण्याच्या प्रस्तावावर मंत्री महोदय यांनी अंतिम स्वाक्षरी केली आहे. त्याम ुळे आज त्यांची मुंबई येथे भेट घेऊन आभार मानले. तसेच सत्कार सुद्धा केला, अशी माहिती स्थानिक आमदार डॉ.रत्नाकर गुट्टे यांनी दिली आहे.

तसेच याच भेटीत विधानसभा मतदारसंघात प्रलंबित असलेले काही प्रकल्प तसेच आगामी काळात आवश्यक असलेली नियोजित विकासकामे या संदर्भाने स्थानिक आमदार डॉ.रत्नाकर गुट्टे यांनी राज्याचे क्रीडा, युवक व अल्पसंख्यांक विकास मंत्री दत्तात्रय भरणे यांच्याशी सविस्तर चर्चा केली घेतली. त्यामुळे आपल्या प्रलंबित कामासंदर्भात वैयक्तिक लक्ष देऊन सकारात्मकपणे कामे मार्गी लावतो, असा शब्द मंत्री भरणे यांनी आ.डॉ.गुट्टे यांना दिला.

विधानसभा मतदारसंघात भव्य क्रीडांगणे, सुसज्ज सभागृहे, ओपन जिम्स, अल्पसंख्याक समाज घटकांसाठी कौशल्य विकास कोर्स, अल्पसंख्याक महिला बचत गट, शैक्षणिक सहकार्य, विविध प्रकारची जनजागृती शिबीरे, युवकांसाठी काही कार्यक्रम तसेच खेळांच्या संदर्भाने काही स्पर्धांचे आयोजन अशा विविध मुद्द्यांवर उभयतांमध्ये चर्चा झाली. त्यामुळे आपल्या विधानसभा मतदारसंघातील प्रलंबित आणि नियोजित विकासकामे, आगामी काळातील धोरणात्मक कार्यक्रम, नाविन्यपूर्ण उपक्रम, यासाठी अंतिम मंजुरीसह भरघोस निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करेन, असेही आश्वासन मंत्री भरणे यांनी आ.डॉ.गुट्टे यांना दिले.

मंत्री भरणे आणि माझे अत्यंत मैत्रीपूर्ण संबंध आहेत. त्यामुळे त्यांच्याकडे हक्काने मागण्या करू शकतो. राज्यभर ओपन जिम्स करीता ७ लाख रूपये दिले जात होते. मात्र, ती रक्कम पुरेशी ठरत नव्हती. याचा माझ्या मतदारसंघात सुद्धा अनुभव आला आहे. त्यामुळे मंत्री महोदयांकडे ७ ऐवजी १४ लाख देण्याची मागणी केली होती. त्यास त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. परिणामी, ७ ऐवजी १४ लाख रूपये देण्याचा अंतिम प्रस्ताव मंजूर केला आहे, याचा विशेष आनंद वाटतो. विशेषतः मागच्या टर्ममध्ये सुद्धा त्यांची मोलाची मदत झाली होती. त्यांनी केलेल्या सहकार्यामुळे मतदारसंघातील अनेक कामे मार्गी लागली होती. पक्ष जरी भिन्न असले, तरी त्यांचे आणि माझे सलोख्याचे संबंध राहिले आहेत. माझ्या सारख्या धडपडणाऱ्या लोकप्रतिनिधीला त्यांनी वेळोवेळी मार्गदर्शन आणि सहकार्य केले आहे. त्यामुळे येत्या काळात सुद्धा ते असेच सहकार्य करतील, असा विश्वास आ.डॉ.गुट्टे यांनी व्यक्त केला.

दरम्यान, गंगाखेड, पालम आणि पूर्णा या तीन तालुक्यांचा समावेश असलेला गंगाखेड विधानसभा हा क्षेत्रफळाच्या दृष्टीने विस्तारीत मतदारसंघ आहे. त्यामुळे आमदार निधीसह विविध मार्गाने उपलब्ध होणारा निधी विकासकामांसाठी पुरेसा ठरत नाही. त्यामुळे आ.डॉ.गुट्टे हे मुंबई आणि दिल्ली वाऱ्या करून अनेक कामे मार्गी लावतात. तसेच वैयक्तिक संबंधांवर विविध मंत्र्यांकडून भरघोस निधी उपलब्ध करतात. त्यामुळे गेल्या अनेक वर्षांचा ब्याकलॉग भरून निघण्यास मदत होत आहे. परिणामी, गुट्टे आणि भरणे भेटीमुळे विधानसभा मतदारसंघाला 'अच्छे दिन' येणार असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

कर्करोगाविरोधात महत्त्वाची पाऊलवाट: फिरती 'कर्करोग निदान व्हॅन' पूर्णा येथे दाखल

(असद शेख/दै.धर्मयोध्दा)

पुर्णा – शहर आणि तालुकास्तरावर कर्करोगाच्या निदानासाठी सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे सुरू करण्यात आलेल्या फिरत्या 'कर्करोग डायग्नोस्टिक व्हॅन'चा शुभारंभ दि.२४ एप्रिल रोजी पूर्णा ग्रामीण रुग्णालयात करण्यात आला. यावेळी शहर आणि तालुक्यातील १६० रुग्णांची मोफत कर्करोग तपासणी करण्यात आली. या फिरत्या व्हॅनच्या माध्यमातून मुखाचा कर्करोग, स्तनाचा कर्करोग व गर्भाशय मुखाचा कर्करोग यांचे निदान ग्रामीण भागात करता येणार असून, पुढील एक महिन्यापर्यंत ही व्हॅन जिल्हाभर फिरणार आहे. गावागावांत आरोग्य कर्मचारी व स्थानिक प्रशासनाच्या सहकार्याने जनजागृती केली जाणार आहे. व्हॅनमध्ये वातानुकूलित व्यवस्था असून स्त्रीरोग व दंतरोग तज्ज्ञांसह अत्याधुनिक वैद्यकीय तपासणीसाठी आवश्यक साधनसामग्री उपलब्ध आहे. या मोहिमेच्या माध्यमातून महिलांम धील वाढत्या कर्करोगाच्या प्रमाणावर नियंत्रण मिळवणे, मृत्यूदर कमी करणे, आणि लवकर निदान करून उपचार सुरू करणे हे प्रमुख उद्दिष्ट आहे.या उपक्रमाचे लाभ नागरिकांनी घ्यावेत, असे आवाहन आरोग्य विभागातर्फे करण्यात आले. या वेळी डॉ. सादिया चिश्ती, डॉ. सुप्रिया राजगुरू, डॉ. संदिप भास्के, अब्दुल शहीद फारुकी, सिन्ड्रेला झांबरे, कृष्णा चापके, ब्रम्हगिरी गुट्टे, उषा पाटील रूमान शेख, सय्यद फयुम, सय्यद सलिम आदींनी येणाऱ्या रूग्णांच्या तपासण्या केल्या.

परभणी - परभणी तालुक्यातील उजळआंबा या गावी रामभाऊ मोगले यांच्या शेतात भर उन्हात महिला शेतकऱ्यांची भुईमुगाच्या शेंगा काडण्याची लगबग सुरू आहे. यावेळी घेतलेले छायाचित्र.

पाटोदा जि.प.शाळेतील विद्यार्थ्यांचे स्पर्धा परीक्षेत यश गुणवंत विद्यार्थ्यांसह शिक्षक वानोळे यांचा ग्रामस्थांनी केला सत्कार

(विवेक भुतेकर/दै.धर्मयोध्दा)

मंठा– जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पाटोदा येथील ८ विद्यार्थ्यांनी आयएएस श्रेया इंटेलिजंट स्पर्धा परीक्षेत राज्यस्तरीय गुणवत्ता यादीत येत घवघवीत यश संपादन केले असून गुणवंत विद्यार्थी व शिक्षकांचा २५ एप्रिल शुक्रवार रोजी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष डी.एस.मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली सदस्य जीवनराव वायाळ, गुणाजी नजान, मारोती जोशी, मनिषा जोशी, बाळासाहेब परभने, योगेश बोराडे, गजानन चव्हाळ, दत्तात्रय गोरे, सुदाम डोळझाके, एकनाथ घोंगडे, नामदेव बोराडे आदी पालकांनी गुणवंतविद्यार्थ्यांसह शिक्षकांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन सत्कार केला. याप्रसंगी बाळासाहेब परभने, पीएमश्री प्रशालेचे मुख्याध्यापक प्रकाश टोम्पे यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप डी.एस.मिसाळ यांनी केला. सूत्रसंचालन मारोती जोशी, प्रास्ताविक गंगाधर वानोळे यांनी केले.तर आभार पी.के.यामुलवाड यांनी मानले.

गुणवंत विद्यार्थी – इयत्ता पहिलीतून रुद्रांश मारोती जोशी (९), सौरभ गुणाजी नजान (९), विठ्ठल सुदाम डोळझाके (१६), अनंता गजानन चव्हाळ (१९), दुसरीतून कालिका जाधव(२७), वेदिका गजेंद्र अंभोरे(२७), तिसरीतून अर्णव डोळझाके(७१), यश दळवे (७२) या क्रमांकाने विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले आहेत. पहिलीतील ३ विद्यार्थी सुवर्णपदकासाठी तर इतर ५ विद्यार्थी रौप्य पदकासाठी पात्र ठरले असून या गुणवंत विद्यार्थ्यांचा आणि स्पर्धा परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना प्रेरित केलेले पहिलीचे वर्गशिक्षक गंगाधर वानोळे, अनुजा पाटील, देविदास मामीलवार, ज्येष्ठ शिक्षक पी.के.यामुलवाड, मुख्याध्यापक प्रकाश टोम्पे यांचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी नवागतांचे स्वागत करीत शाळापूर्व तयारी मेळावाही घेण्यात आला.

उपोषणानंतर जायकवाडी चारीला पाणी सुटणार लाभधारक शेतकऱ्यांना मिळाला दिलासा

(मुरलीधर गोंगे/दै.धर्मयोध्दा)

पाथरी - जायकवाडी पाटबंधारे उपविभागीय कार्यालय पाथरी येथील वितरीका क्रमांक ४९ मधुन पाणी सोडण्यासाठी लाभधारक शेतकऱ्यांनी गुरूवारी उपविभागीय कार्यालय पाथरी येथे उपोषण सुरू असतांना सभापती अनिलराव नखाते यांनी मध्यस्थी केल्याने तातडीने पाणी सोडण्याचे आश्वासन प्रशासनाने दिल्याने उपोषण मागे घेतले.

जायकवाडी पाटबंधारे उपविभागीय कार्यालय पाथरी येथे वितरीका क्रमांक ४९ या चारीला गेल्या ४५ दिवसापासून पाणी सोडण्यात आले नाही त्यामुळे पिकांना मोठ्या प्रमाणात फटका बसत आहे. याशिवाय जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गभीर बनला आहे.दरम्यान मागणी कडे दुर्लक्ष केल्याने उपविभागीय कार्यालय पाथरी येथे २४ एप्रिल रोजी रामचंद्र नखाते, प्रशांत नखाते, सुनिल नखाते, बालासाहेब झिंजाण, विठ्ठल नखाते, विष्णु नखाते,भारत घाटूळ व ईतर शेतकरी उपोषणाला बसले उपोषणस्थळी सभापती अनिलराव नखाते यांनी भेट देऊन त्यांनी यासंदर्भात जायकवाडीत चे कार्यकारी अभियंता प्रसाद लांब यांचेशी संवाद साधला त्यानंतर पाणी सोडण्याचे आश्वासन दिले.त्यानंतर सभापती अनिलराव नखाते यांनी उपोषणकर्ते यांना लिंबु पाणी देऊन उपोषण सोडविण्यात आले.या निर्णयामुळे लाभधारक शेतकऱ्यांना एकप्रकारे दिलासा मिळाला आहे.

पिंपळगांव बाळापुर येथे भीमजन्मोत्सव सोहळा हर्षोल्लासात साजरा

(जावेद पटेल/दै.धर्मयोध्दा)

पुर्णा – तालुक्यातील पिंपळगांव बाळापुर येथे दरवर्षीप्रमाणे भीमजन्मोत्सव अर्थात संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४व्या जयंतीचा उत्सव २० एप्रिल रोजी साजरा करण्यात आला. या जयंती सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी सरंपच कमलाबाई रणवीर ह्या होत्या तर हे कार्यक्रमाचे पाहुणे म्हणून शिवसेना नेते, ममदापुर बंधाऱ्याचे शिल्पकार जलील पटेल, माजी सरपंच, माजी जि.प. सदस्य पांडुरंग बनसोडे, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अपर संचालक अनिल रणवीर, वंचित बहुजन आघाडीचे नेते माजी नगरसेवक दादाराव पंडित, सुरवाडीचे माजी सरपंच साहेबराव वाटोडे, नवनाथ खंदारे, पोलीस पाटील अन्नपूर्णा रेनगडे इ. उपस्थित होते.

रविवारी (ता. १४) सकाळी ९ वा. सरपंच कमलबाई भीमराव रणवीर यांच्या हस्ते पंचशील, धम्मध्वजाचे ध्वजारोहण संपन्न झाले. तसेच सार्वजनिक त्रिशरण पंचशील घेण्यात आले. यानंतर दुपारी ३ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्राची मिरवणूक वाजत-गाजत प्रमुख मार्गाने काढण्यात आली. यावेळी संगीत व वाद्यांसह भीमगितांचा तालावर तरुणाई बेभान नाचली. मिरवणुकीत महिला, पुरूष व बाल भीम सैनिकांनी अत्यंत उत्साहाने सहभाग घेतला. सायंकाळी ७ वाजता मिरवणुकीची सांगता शांततेत झाली. यानंतर झालेल्या कार्यक्रमात मुख्य जलील पटेल, अनिल रणवीर व दादाराव पंडित यांनी थोडक्यात मनोगत व्यक्त करत उपस्थितांना भीमोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. रात्री भोजनदानाच्या कार्यक्रमानंतर सुप्रसिद्ध गायिका दीपाली कांबळे आणि संच, लातूर व गायक शाहीर विकास राजा, नांदेड यांच्या भीम व बुद्ध गितांनी बौद्ध उपासक, उपासिका तृप्त झाले.

भीम जयंती सोहळा यशस्वी करण्यासाठी गंगाधर रणवीर, प्रकाश दिपके, बालासाहेब रणवीर, आबासाहेब राऊत, प्रकाश दुधमल, भीमराव रणवीर, सोपान रणवीर, नामदेव दुधमल, नारायण रणवीर यांच्या मार्गदर्शनाखाली जयंती समितीचे अध्यक्ष प्रीतम रणवीर, उपाध्यक्ष सुनील रणवीर, सचिव आनंद रणवीर, कोषाध्यक्ष आशिष दिपके, सहकोषाध्यक्ष सुशील दुधमल, राहुल रणवीर, संदीप राऊत यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन राष्ट्रवादी काँग्रेस, सामाजिक न्याय विभागाचे जिल्हा उपाध्यक्ष, बौद्धाचार्य धनंजय रणवीर यांनी केले.

पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा पूर्णेत मुस्लिम बांधवांकडून तीव्र निषेध

(असद शेख/दै.धर्मयोध्दा)

पुर्णा – जम्मू- काश्मीर मधील पहलगाम येथे २३ एप्रिल रोजी झालेल्या निर्घृण दहशतवादी हल्ल्याने संपूर्ण देश हादरला आहे. या अमानवी हल्ल्याचा पूर्णा येथील मुस्लिम बांधवांच्या वतीने तीव्र निषेध व्यक्त करत तहसीलदार यांच्यामार्फत महामहीम राष्ट्रपतीं यांच्याकडे दिनांक २५ एप्रिल रोजी निवेदन पाठवण्यात आले पेश ईमाम मौलाना शमीम अहमद रिझवी यांच्या मार्गदर्शनाखाली हे निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की,या भ्याड हल्ल्यात अनेक निष्पाप पर्यटकांचे प्राण गेले. ही क्रूरता माणुसकीला काळिमा फासणारी आहे.आम्ही या घटनेचा तीव्र शब्दांत निषेध व्यक्त केला आणि हल्ल्यात बळी पडलेल्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली या हल्ल्याच्या निषेधार्थ पूर्णा शहरातील असंख्य व्यापाऱ्यांनी आपली दुकाने स्वयंस्फूर्तीने बंद ठेवले होते. या वेळी मुस्लिम बांधवांकडून पुढील मागणीही करण्यात आली दहशतवादाला धर्म नसतो. अशा कृत्यांविरोधात कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. जेव्हा माणुसकी धोक्यात येते, तेव्हा शांतता राखणाऱ्या नागरिकांनीही ठाम भूमिका घ्यावी लागते. या दहशतवाद्यांना कठोरातील कठोर शिक्षा भर चौकात फाशी दिली जावी, ही आमची ठाम मागणी आहे..या निवेदन प्रसंगी रोफ कुरेशी, जाकीर खुरेशी, शेख अक्रम, सरान बागवान, अली अन्सारी, अमजद पठाण, शेख इरफान, शेख इलियास, दादा मिया, राऊफ बागवान, शेख अनु, आमजत नुरी, शेख खुदुस यांच्यासह शहरातील असंख्य मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते याप्रसंगी चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता

दैनिक धर्मयोध्दा हे पत्र मुद्रक, प्रकाशक व मालक शिंदे रामेश्वर गणपतराव यांनी प्रविण प्रिंटींग प्रेस शॉप नं.१४ सुपर मार्केट, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथे छापून धर्म योध्दा कार्यालय, विकास नगर, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथुन प्रसिध्द केले. **संपादक–शिंदे रामेश्वर गणपतराव**

DHARMA YODDHA Daily Publisher, Printer, Owner by- Shinde Rameshwar Ganpatrao, Printed at Pravin Printing press Shop No 14 Super Market Karegaon Road Parbhani 431401 (M.S) And Published A√t Dharmayoddha Karyalaya Vikas Nagar,Karegaon Road Parbhani. 431401 (M.S) Editor By - Shinde Rameshwar Ganpatrao